# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## कपिल गीता षष्ठम अध्याय (भा°म°3.26)



वर्णन करने सांख्य योग का, और देने को ज्ञान ।
गुरु रूप में कपिल मुनि थे, देवहूति शिष्य समान।

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**
**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**
**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

**श्रीमद्भागवतमहापुराणम्**

**तृतीय स्कंध:**

**॥ षड्विंशोऽध्यायः ॥**

**श्रीभगवानुवाच**

**अथ ते सम्प्रवक्ष्यामि, तत्त्वानां(लँ) लक्षणं(म्) पृथक् ।**
**यद्विदित्वा विमुच्येत, पुरुषः(फ्) प्राकृतैर्गुणैः ॥ 1॥**

श्री भगवान म्हणाले -आता मी तुला प्रकृती इत्यादी तत्वांचे वेगवेगळे लक्षण सांगतो 'जे जाणल्याने मनुष्य प्रकृतीच्या गुणांपासून मुक्त होतो.

**ज्ञानं(न्) निः(श्)श्रेयसार्थाय, पुरुषस्यात्मदर्शनम् ।**
**यदाहुर्वर्णये तत्ते, हृदयग्रन्थिभेदनम् ॥ 2॥**

आत्मदर्शनरूप ज्ञानच पुरुषाच्या मोक्षाला कारण आहे आणि तेच त्याच्या अहंकार रूप हृदय ग्रंथीचे छेदन करणारे आहे ,असे पंडित म्हणतात .अशा सज्ञानाचे मी तुला यापुढे वर्णन करून सांगतो.

**अनादिरात्मा पुरुषो, निर्गुणः(फ्) प्रकृतेः(फ्) परः ।**

**प्रत्यग्धामा स्वयञ्ज्योतिर्-विश्वं(यँ) येन समन्वितम् ॥ 3॥**

हे सर्व विश्व ज्याच्यामुळे व्यक्त होऊन प्रकाशित होते ,तो आत्मा म्हणजेच पुरुष होय.तो अनादी, निर्गुणा प्रकृतीच्या पलीकडील, अंतःकरणात फिरणारा व स्वयंप्रकाशी आहे.

**स एष प्रकृतिं(म्) सूक्ष्मां(न्), दैवीं(ख्) गुणमयीं(वँ) विभुः ।**

**यदृच्छयैवोपगता-मभ्यपद्यत लीलया ॥ 4॥**

त्या सर्व व्यापक पुरुषाने लीला विलास पूर्वक आपल्याजवळ आलेल्या अव्यक्त आणि त्रिगुणात्मक वैष्णवी मायेचा स्वेच्छेने स्वीकार केला आहे.

**गुणैर्विचित्राः(स्) सृजतीं(म्), स्वरूपाः(फ्) प्रकृतिं(म्) प्रजाः ।**

**विलोक्य मुमुहे सद्यः(स्), स इह ज्ञानगूहया ॥ 5॥**

लीला परायण प्रकृती आपल्या सतवादी गुणांनी त्यांच्यासारख्याच प्रजेची निर्मिती करू लागली ,हे पाहून ज्ञान झाकणाऱ्या तिच्या आवरण शक्तीने पुरुष तत्काळ मोहीत झाला आणि आपल्या स्वरूपाला विसरला.

**एवं(म्) पराभिध्यानेन, कर्तृत्वं(म्) प्रकृतेः(फ्) पुमान् ।**

**कर्मसु क्रियमाणेषु, गुणैरात्मनि मन्यते ॥ 6॥**

अशाप्रकारे आपल्यापेक्षा भिन्न प्रकृतीलाच आपले स्वरूप समजल्याने पुरुष ,प्रकृतीच्या गुणांकडून केल्या जाणाऱ्या कर्मांचा आपणच करत आहोत ,असे मानू लागतो.

**तदस्य सं(म्)सृतिर्बन्धः(फ्), पारतन्त्र्यं(ञ्) च तत्कृतम् ।**

**भवत्यकर्तुरीशस्य, साक्षिणो निर्वृतात्मनः ॥ 7॥**

या कर्तृत्व भीमानामुळेच अकर्ता ,स्वाधीन ,साक्षी आणि आनंद स्वरूप पुरुषाला जन्म मृत्यू रूप बंधन आणि पारतंत्र्य येते.

**कार्यकारणकर्तृत्वे, कारणं(म्) प्रकृतिं(वँ) विदुः ।**

**भोक्तृत्वे सुखदुःखानां(म्), पुरुषं(म्) प्रकृतेः(फ्) परम् ॥ 8॥**

कार्यरूप शरीर ,कारण रुपये इंद्रिये तसेच कर्तारुप इंद्रिया अधिष्ठा त्यादेवता यांना पुरुष जो 'मी मानतो 'त्याला प्रकृती हेच कारण आहे 'असे पंडित मानतात .तसेच वास्तविक प्रकृतीच्या पलीकडचा असूनही जो प्रकृतीमध्येच राहतो ,त्या पुरुषाला सुखदुःख भोगण्याचे कारण मानले जाते.

## देवहूतिरुवाच

**प्रकृतेः(फ्) पुरुषस्यापि, लक्षणं(म्) पुरुषोत्तम ।**

**ब्रूहि कारणयोरस्य, सदसच्च यदात्मकम् ॥ 9॥**

देवहूती म्हणाली -हे पुरुषोत्तम या विश्वातील स्थूलअ सूक्ष्म कार्य ज्यांचे स्वरूप आहे .तसेच जे यांचे कारण आहे, ती, प्रकृती आणि पुरुष यांची लक्षणे सुद्धा आपण मला सांगावीत.

## श्रीभगवानुवाच

**यत्तत्त्रिगुणमव्यक्तं(न्), नित्यं(म्) सदसदात्मकम् ।**

**प्रधानं(म्) प्रकृतिं(म्) प्राहु-रविशेषं(वँ) विशेषवत् ॥ 10॥**

श्री भगवान म्हणाले -जे त्रिगुणात्मक ,अव्यक्त ,नित्य आणि कार्य -कारण रूप आहे ,तसेच अभ्यक्त असूनही संपूर्ण व्यक्त पदार्थांचा आश्रय आहे ,त्या प्रधान नावाच्या तत्वाला च प्रकृती म्हणतात.

**पञ्चभिः(फ्) पञ्चभिर्ब्रह्म, चतुर्भिर्दशभिस्तथा ।**

**एतच्चतुर्विं(म्)शतिकं(ङ्), गणं(म्) प्राधानिकं(वँ) विदुः ॥ 11॥**

पंचमहाभुते ,पाच तन्मात्रा ,चार अंतःकरणे (मन ,बुद्धी ,चित्त आणि अहंकार )आणि दहा इंद्रिये 'या 24 तत्वांच्या समूहाला विद्वान लोक प्रकृतीचे कार्य मानतात.

**महाभूतानि पञ्चैव, भूरापोऽग्निर्मरुन्नभः ।**

**तन्मात्राणि च तावन्ति, गन्धादीनि मतानि मे ॥ 12॥**

माझ्या मते पृथ्वी, जल, तेज, वायू आणि आकाश ही पंचमहाभूते व गंध रस रूप स्पर्श आणि शब्द या त्यांच्या पाच तन्मात्रा आहेत.

**इन्द्रियाणि दश श्रोत्रं(न्), त्वग् दृग्रसननासिकाः ।**

**वाक्करौ चरणौ मेढ्रं(म्), पायुर्दशम उच्यते ॥ 13॥**

कान ,त्वचा ,डोळे, नाक 'जीभ (ज्ञानेंद्रिये )वाणी 'हात ,पाय ,शिश्न आणि गुद (कर्मेंद्रिये ) ही दहा इंद्रिये होत.

**मनो बुद्धिरहङ्कारश्-चित्तमित्यन्तरात्मकम् ।**

**चतुर्धा लक्ष्यते भेदो, वृत्त्या लक्षणरूपया ॥ 14॥**

मन ,बुद्धी ,चित्त आणि अहंकार या चार रूपात असलेले एकच अंतकरण आपला संकल्प ,निश्चय ,चिंतन आणि ' मी ' ची जाणीव अशा चार प्रकारच्या वृत्तींनी ओळखले जाते.

**एतावानेव सङ्ख्यातो, ब्रह्मणः(स्) सगुणस्य ह ।**

**सन्निवेशो मया प्रोक्तो, यः(ख्) कालः(फ्) पञ्चविं(म्)शकः ॥ 15॥**

अशाप्रकारे मी सगुण ब्रह्माचा आकार विशेष म्हणून ही 24 तत्वांची संख्या सांगितली .या खेरीज जो काळ आहे, ते पंचविसावे तत्व होय.

प्रभावं(म्) पौरुषं(म्) प्राहुः(ख्), कालमेके यतो भयम् ।

अहङ्कारविमूढस्य, कर्तुः(फ्) प्रकृतिमीयुषः ॥ 16॥

मायेचे कार्य असलेल्या देह इत्यादींना 'मी ' म्हणून आपल्यालाच करता मानणाऱ्या जीवालाच ज्याचे भय वाटते त्या काळाला (वेगळे तत्त्व न मानता )काहीजण ईश्वराची संहारक शक्ती मानतात।

प्रकृतेर्गुणसाम्यस्य, निर्विशेषस्य मानवि ।

चेष्टा यतः(स्) स भगवान्, काल इत्युपलक्षितः ॥ 17॥

हे मनपुत्री ,ज्याच्या प्रेरणेमुळे गुणांची साम्या वस्था रूप अभ्यक्त प्रकृतीत गती उत्पन्न होते ,त्या भगवानांच काल म्हणतात.

अन्तः(फ्) पुरुषरूपेण, कालरूपेण यो बहिः ।

समन्वेत्येष सत्त्वानां(म्), भगवानात्ममायया ॥ 18॥

अशाप्रकारे जे आपल्या मायेच्या द्वारे सर्व प्राण्यांमध्ये जीव रुपाने आणि बाहेर काल रूपाने व्याप्त आहेत ,ते भगवानच पंचविसावे तत्व आहेत.

दैवात्क्षुभितधर्मिण्यां(म्), स्वस्यां(यँ) योनौ परः(फ्) पुमान्

आधत्त वीर्यं(म्) सासूत, महत्तत्त्वं(म्) हिरण्मयम् ॥ 19॥

जेव्हा परमपुरुषाने जीवांच्या अदृष्ट्यानुसार कार्यप्रवण झालेल्या ,समस्त जीवांचे उत्पत्ती स्थान अशा मायेमध्ये चैतन्य रूप विर्य स्थापित केले ,तेव्हा त्यापासून तेजोमय महत्तत्व उत्पन्न झाले.

विश्वमात्मगतं(वँ) व्यञ्जन्, कूटस्थो जगदङ्कुरः ।

स्वतेजसापिबत्तीव्र-मात्मप्रस्वापनं(न्) तमः ॥ 20॥

लय -विक्षेपा दिरहित तसेच जगाचे अंकुर रूप या मत तत्वाने आपल्यात असलेल्या विश्वाला प्रगट करण्यासाठी आपल्या स्वरूपाला अच्छादित करणाऱ्या प्रलयकालीन अंधकाराला आपल्या तेजाने नाहीसे केले.

यत्तत्सत्त्वगुणं(म्) स्वच्छं(म्), शान्तं(म्) भगवतः(फ्) पदम् ।

यदाहुर्वासुदेवाख्यं(ञ्), चित्तं(न्) तन्महदात्मकम् ॥ 21॥

जे सत्वगुणमय ,स्वच्छ ,शांत आणि भगवंतांच्या उपलब्धीचे स्थान रूप चित्त आहे ,तेच महत्तत्वआहे आणि त्यालाच "वासुदेव "म्हणतात.

स्वच्छत्वमविकारित्वं(म्), शान्तत्वमिति चेतसः ।

वृत्तिभिर्लक्षणं(म्) प्रोक्तं(यँ), यथापां(म्) प्रकृतिः(फ्) परा ॥ 22॥

ज्याप्रमाणे पाणी आपल्या मूळ अवस्थेमध्ये अत्यंत स्वच्छ ,विकार शून्य आणि शांत असते ,त्याचप्रमाणे स्वाभाविक अवस्थेत स्वच्छ ,अविकारी आणि शांत असणारे ते चित्त असे हे वृत्तींसह चित्ताचे लक्षण सांगितले आहे.

महत्तत्त्वाद्विकुर्वाणाद्-भगवद्वीर्यसम्भवात् ।

क्रियाशक्तिरहङ्कारस्-त्रिविधः(स्) समपद्यत ॥ 23॥

वैकारिकस्तैजसश्च, तामसश्च यतो भवः ।

मनसश्चेन्द्रियाणां(ञ्) च, भूतानां(म्) महतामपि ॥ 24॥

त्यानंतर भगवंतांच्या वीर्य रूप चित् शक्तीपासून उत्पन्न झालेल्या महत्तत्वाच्याक्रियाशील होण्याने त्यापासून क्रिया शक्ती प्रधान असा अहंकार उत्पन्न झाला .तो वैकारिक ,तैजसआणि तामसभेदाने तीन प्रकारचा आहे .त्यापासूनच क्रमशः मन ,इंद्रिय आणि पंचमहाभूतांची उत्पत्ती झाली.

सहस्रशिरसं(म्) साक्षाद्-यमनन्तं(म्) प्रचक्षते ।

सङ्कर्षणाख्यं(म्) पुरुषं(म्), भूतेन्द्रियमनोमयम् ॥ 25॥

या भूत ,इंद्रिय आणि मनरूप अहंकाराला पंडित लोक साक्षात "संकर्षण " नावाचा एक हजार शिरे असलेला अनंतदेव म्हणतात.

कर्तृत्वं(ङ्) करणत्वं(ञ्) च, कार्यत्वं(ञ्) चेति लक्षणम् ।

शान्तघोरविमूढत्व-मिति वा स्यादहंकृतेः ॥ 26॥

या अहंकाराचे देवतारूपाने कर्तृत्व ,इंद्रिय रुपाने करणत्वआणि पंचभूत रूपाने कार्यत्व हे लक्षण आहे. तसेच सतवादी गुणांच्या संबंधाने शांतत्व ,घोरत्व आणि मूढत्वही सुद्धा याचीच लक्षणे होत.

वैकारिकाद्विकुर्वाणान्-मनस्तत्त्वमजायत ।

यत्सङ्कल्पविकल्पाभ्यां(वँ), वर्तते कामसम्भवः ॥ 27॥

वरील तीन प्रकारच्या अहंकारांपैकी वैकारिक अहंकार क्रियाशील झाल्याने त्यापासून मन हे तत्व उत्पन्न झाले .त्याच्या संकल्प विकल्पांमुळे कामना उत्पन्न होतात.

यद्विदुर्ह्यनिरुद्धाख्यं(म्), हृषीकाणामधीश्वरम् ।

शारदेन्दीवरश्यामं(म्), सं(म्)राध्यं(यँ) योगिभिः(श्) शनैः ॥ 28॥

हे मन तत्व इंद्रियांचा अधिष्ठाता "अनिरुद्ध " या नावाने प्रसिद्ध आहे .योगी लोक शरद ऋतुतील नील कमळाप्रमाणे श्यामवरणाच्या या अनिरुद्धाची पुन्हा पुन्हा मनाला वश करून आराधना करीत असतात.

तैजसात्तु विकुर्वाणाद्-बुद्धितत्त्वमभूत्सति ।

द्रव्यस्फुरणविज्ञान-मिन्द्रियाणामनुग्रहः ॥ 29॥

हे साध्वी ,पुढे तेजस अहंकार क्रियाशील झाल्याने त्यापासून बुद्धी तत्व उत्पन्न झाले .वस्तूचे स्फुरणरूप विज्ञान आणि इंद्रियांच्या कामांत सहाय्य करणे हे बुद्धीचे कार्य आहे.

सं(म्)शयोऽथ विपर्यासो, निश्चयः(स्) स्मृतिरेव च ।

स्वाप इत्युच्यते बुद्धेर्-लक्षणं(वृँ) वृत्तितः(फ्) पृथक् ॥ 30॥

वृत्तींच्या भेदांमुळे संशय 'विपरीतज्ञान ,निश्चय ,स्मृती आणि निद्रा ही बुद्धीची निरनिराळी लक्षणे होत.

तैजसानीन्द्रियाण्येव, क्रियाज्ञानविभागशः ।

प्राणस्य हि क्रियाशक्तिर्-बुद्धेर्विज्ञानशक्तिता ॥ 31॥

इंद्रिय हे सुद्धा तैजसअहंकाराचेच कार्य होय .कर्मणी ज्ञानाच्या विभागाने त्यांचे कर्मेंद्रिये आणि ज्ञानेन्द्रिय असे दोन भेद आहेत .यामध्ये कर्म ही प्राणांची आणि ज्ञान बुद्धीची शक्ती होय

तामसाच्च विकुर्वाणाद्-भगवद्वीर्यचोदितात् ।

शब्दमात्रमभूत्तस्मान्-नभः(श्) श्रोत्रं(न्) तु शब्दगम् ॥ 32॥

भगवंतांच्या चेतनाशक्तीच्या प्रेरणेने तामस अहंकार विकृत होऊन त्यापासून शब्द तन्मात्रेची उत्पत्ती झाली. शब्द तन्मातेपासूनआकाश उत्पन्न झाले .शब्दाचे ज्ञान श्रोत्रेंद्रिय करून देते.

अर्थाश्रयत्वं(म्) शब्दस्य, द्रष्टुर्लिङ्गत्वमेव च ।

तन्मात्रत्वं(ञ्) च नभसो, लक्षणं(ङ्) कवयो विदुः ॥ 33॥

शब्दाच्या अर्थाचे ज्ञान करून देणे ,न दिसणाऱ्या ही बोलणाऱ्याच्या स्थानाचे ज्ञान करून देणे आणि आकाशाचे सूक्ष्म रूप असणे हीच विद्वानांच्या मते शब्दाची लक्षणे होत.

भूतानां(ञ्) छिद्रदातृत्वं(म्), बहिरन्तरमेव च ।

प्राणेन्द्रियात्मधिष्ण्यत्वं(न्), नभसो वृत्तिलक्षणम् ॥ 34॥

सर्व वस्तूंना पोकळी उपलब्ध करून देणे ,सर्वांच्या आत बाहेर राहणे ,तसेच प्राण ,इंद्रिये आणि मन यांचा आश्रय होणे ,ही आकाशाची कार्यरूप लक्षणे होत.

नभसः(श्) शब्दतन्मात्रात्-कालगत्या विकुर्वतः ।

स्पर्शोऽभवत्ततो वायुस्-त्वक्स्पर्शस्य च सङ्ग्रहः ॥ 35॥

नंतर शब्दतन्मात्रेचेकार्य असणाऱ्या आकाशात कालगतीने विकार झाल्याकारणाने स्पर्शत न्मात्र उत्पन्न झाले आणि त्यापासून वायू उत्पन्न झाला .स्पर्शाचे उत्तमज्ञान त्वचा करून देते.

मृदुत्वं(ङ्) कठिनत्वं(ञ्) च, शैत्यमुष्णत्वमेव च ।

एतत्स्पर्शस्य स्पर्शत्वं(न्), तन्मात्रत्वं(न्) नभस्वतः ॥ 36॥

कोमलता ,कठोरता ,शीतलता ,उष्णता आणि वायूचे सूक्ष्मरूप असणे ही स्पर्शाची लक्षणे होत.

चालनं(वँ) व्यूहनं(म्) प्राप्तिर्-नेतृत्वं(न्) द्रव्यशब्दयोः ।

सर्वेन्द्रियाणामात्मत्वं(वँ), वायोः(ख्) कर्माभिलक्षणम् ॥ 37॥

वृक्षाच्या फांद्या इत्यादींना हलविणे ,तृण इत्यादींना एकत्रित करणे ,सगळीकडे पोहोचविणे ,गंध युक्त द्रव्याला नाका जवळ तसेच शब्दाला काना जवळ येणे ,त्याचप्रमाणे सर्व इंद्रियांमध्ये कार्यशक्ती उत्पन्न करणे ,ही वायूच्या वृत्तीची लक्षणे होत.

वायोश्च स्पर्शतन्मात्राद्-रूपं(न्) दैवेरितादभूत् ।

समुत्थितं(न्) ततस्तेजश्-चक्षू रूपोपलम्भनम् ॥ 38॥

त्यानंतर दैवाच्या प्रेरणेने स्पर्शतन्मात्र विशिष्टवायूच्या विकृत होण्याने रुपत न्मात्र उत्पन्न झाले .तसेच त्यापासून तेज आणि रूपाला प्रगट करणाऱ्या नेत्रेंद्रियाचा उगम झाला.

द्रव्याकृतित्वं(ङ्) गुणता, व्यक्तिसं(म्)स्थात्वमेव च ।

तेजस्त्वं(न्) तेजसः(स्) साध्वि, रूपमात्रस्य वृत्तयः ॥ 39॥

हे साध्वी ,वस्तूच्या आकाराचे ज्ञान करून देणे ,पदार्थाच्या अंगरूपाने असणे ,पदार्थाचा जसा आकार प्रकार आणि परिमाण इत्यादी असेल तसेच त्याचे स्वरूप दाखविणे आणि तेजो रूप असणे या सर्व रूपतन्मात्राच्यावृत्ती होत.

द्योतनं(म्) पचनं(म्) पान-मदनं(म्) हिममर्दनम् ।

तेजसो वृत्तयस्त्वेताः(श्), शोषणं(ङ्) क्षुत्तृडेव च ॥ 40॥

चमकणे, पक्व करणे ,थंडी दूर करणे ,सुकविणे ,तहानभूक उत्पन्न करून त्यांच्या निवृत्तीकरता भोजन करणे ,पाणी पिणे या तेजाच्या वृत्ती होत.

रूपमात्राद्विकुर्वाणात्-तेजसो दैवचोदितात् ।

रसमात्रमभूत्तस्मा-दम्भो जिह्वा रसग्रहः ॥ 41॥

नंतर दैवाच्या प्रेरणेने रुपतन्मात्र मयतेज विकृत झाल्याने त्यापासून रसतन्मात्रउत्पन्न झाले आणि त्याच्यापासून पाणी व रसाला ग्रहण करणारी जीभ उत्पन्न झाली.

कषायो मधुरस्तिक्तः(ख्), कट्वम्ल इति नैकधा ।

भौतिकानां(वँ) विकारेण, रस एको विभिद्यते ॥ 42॥

एकच रस भौतिक पदार्थांशी संयोग झाल्याने तुरट , गोड , तिखट , कडू , आंबट , खारटइत्यादी अनेक प्रकारचा होतो.

क्लेदनं(म्) पिण्डनं(न्) तृप्तिः(फ्), प्राणनाप्यायनोन्दनम् ।

तापापनोदो भूयस्त्व- मम्भसो वृत्तयस्त्विमाः ॥ 43॥

भिजविणे ,माती इत्यादींचा गोळा करणे ,तृप्त करणे ,जिवंत ठेवणे 'तहान भागविणे ,पदार्थांना मृदू बनविणे , उष्णता नाहीशी करणे आणि विहिरी इत्यादीतून बाहेर काढल्यावरही तेथे पुन्हा पुन्हा प्रगट होणे या पाण्याच्या वृत्ती आहेत.

रसमात्राद्विकुर्वाणा-दम्भसो दैवचोदितात् ।

गन्धमात्रमभूत्तस्मात्-पृथ्वी घ्राणस्तु गन्धगः ॥ 44॥

यानंतर दैवाने प्रेरित झाल्याने पाणी विकृत होऊन त्यापासून गंधतन्मात्रउत्पन्न झाले आणि त्यापासून पृथ्वी व वास ग्रहण करणारे नाक प्रकट झाले.

करम्भपूतिसौरभ्य-शान्तोग्राम्लादिभिः(फ्) पृथक् ।

द्रव्यावयववैषम्याद्-गन्ध एको विभिद्यते ॥ 45॥

परस्पर मिसळलेल्या पदार्थांच्या कमी अधिकपणामुळे तो वास मिश्रगंध ,दुर्गंध ,सुगंध मृदू, तीव्र, आंबट इत्यादी अनेक प्रकारचा होतो.

भावनं(म्) ब्रह्मणः(स्) स्थानं(न्), धारणं(म्) सद्विशेषणम् ।

सर्वसत्त्वगुणोद्भेदः(फ्), पृथिवीवृत्तिलक्षणम् ॥ 46॥

प्रतिमा इत्यादी रूपांनी ब्रह्माचे साकार होणे ,पाणी इत्यादी कारण तत्वांपासून भिन्न अशा दुसऱ्या कोणत्याही आश्रयाची अपेक्षा केल्याखेरीज राहणे ,पाणी इत्यादी अन्य पदार्थांना धारण करणे ,आकाश इत्यादींचे विभाग दाखविणे (घटा काश , मठाकाश इत्यादी )तसेच सर्व प्राण्यांच्या स्त्री त्व ,पुरुषत्व इत्यादी गुणांना प्रगट करणे ही पृथ्वीची कार्यरूप लक्षणे आहेत.

नभोगुणविशेषोऽर्थो, यस्य तच्छ्रोत्रमुच्यते ।

वायोर्गुणविशेषोऽर्थो, यस्य तत्स्पर्शनं(वँ) विदुः ॥ 47॥

आकाशाचा विशेष गुण शब्द हा ज्याचा विषय आहे ,ते श्रोत्रेंद्रिय (कान )होय .वायुचा विशेष गुण स्पर्श हा ज्याचा विषय आहे ,ते त्वगिंद्रिय ( त्वचा )होय.

तेजोगुणविशेषोऽर्थो, यस्य तच्चक्षुरुच्यते ।

अम्भोगुणविशेषोऽर्थो, यस्य तद्रसनं(वँ) विदुः ।

भूमेर्गुणविशेषोऽर्थो, यस्य स घ्राण उच्यते ॥ 48॥

तेजाचा विशेष गुण रूप हा ज्याचा विषय आहे ,ते नेत्रेंद्रिय (डोळा)होय .पाण्याचा विशेष गुण रसाहार असा विषय आहे ते रसनेंद्रिय ( जीभ )होय आणि पृथ्वीचा विशेष गुणगंध ज्याचा विषय आहे ,त्याला ( घ्राणेंद्रिय ) नाकम्हणतात.

परस्य दृश्यते धर्मो, ह्यपरस्मिन् समन्वयात् ।

अतो विशेषो भावानां(म्), भूमावेवोपलक्ष्यते ॥ 49॥

वायु इत्यादी कार्य तत्वांमध्ये आकाश आधी कारण तत्वे राहत असल्यामुळे त्यांचे गुण त्यात दिसतात .म्हणून सर्व महाभुतांचे गुण शब्द ,स्पर्श ,रूप 'रस आणि गंध केवळ पृथ्वीतच आढळतात.

**एतान्यसं(म्)हत्य यदा, महदादीनि सप्त वै ।**

**कालकर्मगुणोपेतो, जगदादिरुपाविशत् ॥ 50॥**

जेव्हा महत्तत्व ,अहंकार आणि पंचमहाभूते _ही सात तत्वे एकमेकात मिसळू शकली नाहीत ,तेव्हा जगाचे आदिकारण श्री नारायणांनी काल ,अदृष्ट आणि सतवादी गुणांसहित त्यांमध्ये प्रवेश केला.

**ततस्तेनानुविद्धेभ्यो, युक्तेभ्योऽण्डमचेतनम् ।**

**उत्थितं(म्) पुरुषो यस्मा-दुदतिष्ठदसौ विराट् ॥ 51॥**

नंतर परमात्म्याने प्रवेश केल्याने क्षुब्ध झालेल्या आणि आपापसात मिसळलेल्या त्या तत्त्वांपासून एक अचेतन अंडे उत्पन्न झाले .त्यापासून या विराट पुरुषाची उत्पत्ती झाली.

**एतदण्डं(वँ) विशेषाख्यं(ङ्), क्रमवृद्धैर्दशोत्तरैः ।**

**तोयादिभिः(फ्) परिवृतं(म्), प्रधानेनावृतैर्बहिः ।**

**यत्र लोकवितानोऽयं(म्), रूपं(म्) भगवतो हरेः ॥ 52॥**

या अंड्याचे नाव 'विशेष ' आहे .त्याच्या अंतर्गत श्रीहरींच्या स्वरूप भूत चौदाही भुवन यांचा विस्तार आहे .हे सर्व बाजूंनी क्रमशः एक दुसऱ्यांपेक्षा दहा पट अधिक अशा पाणी ,अग्नी 'वायु ,आकाश ,अहंकार आणि महत्तत्वया सहा आवरणांनी आच्छा दिले आहे .या सर्वांच्या बाहेर सातवे आवरण प्रकृतीचे आहे.

**हिरण्मयादण्डकोशा-दुत्थाय सलिलेशयात् ।**

**तमाविश्य महादेवो, बहुधा निर्बिभेद खम् ॥ 53॥**

कारण मया पाण्यात असणाऱ्या त्या तेजोमय अंड्यातून उठून त्या विराट पुरुषाने पुन्हा त्याचंच प्रवेश केला आणि त्यात अनेक प्रकारची छिद्रे निर्माण केली.

**निरभिद्यतास्य प्रथमं(म्), मुखं(वँ) वाणी ततोऽभवत् ।**

**वाण्या वह्निरथो नासे, प्राणोऽतो घ्राण एतयोः ॥ 54॥**

सर्वप्रथम त्यात मुख प्रकट झाले .त्यातून वाक् इंद्रिय आणि वाणीसह वाणीचा अधिष्ठाता अग्नी प्रविष्ट झाला .नंतर नाकाची छिद्रे प्रगट झाली .प्राणसहित  घ्रानेंद्रिय उत्पन्न झाले.

**घ्राणाद्वायुरभिद्येता-मक्षिणी चक्षुरेतयोः ।**

**तस्मात्सूर्यो व्यभिद्येतां(ङ्), कर्णौ श्रोत्रं(न्) ततो दिशः ॥ 55॥**

ग्रानेंद्रियानंतर त्याचा अधिष्ठाता वायू त्यात प्रविष्ट झाला .त्यानंतर नेत्र गोल प्रगट झाले .त्यापासून नेत्रंद्रिय प्रकट झाले .आणि त्यात पश्चात त्याचा अधिष्ठाता सूर्य तेथे प्रविष्ट झाला .मग कानाची छिद्रे प्रगट झाली .त्यापासून त्याचे इंद्रिय क्षोत्र आणि त्याची अभिमानी दिशा -देवता त्यात प्रगट झाली.

निर्बिभेद विराजस्त्वं-ग्रोमश्मश्वादयस्ततः ।

तत ओषधयश्चासन्, शिश्नं(न्) निर्बिभिदे ततः ॥ 56॥

यानंतर त्या विराट पुरुषाला त्वचा उत्पन्न झाली .त्यापासून छिद्रे व तेथे दाढी मिशा तसेच डोक्यावरील केस प्रगट झाले .यानंतर त्वचेची देवता औषधी उत्पन्न झाल्या .नंतर लिंग प्रगट झाले.

रेतस्तस्मादाप आसन्, निरभिद्यत वै गुदम् ।

गुदादपानोऽपानाच्च, मृत्युर्लोकभयङ्करः ॥ 57॥

त्यापासून वीर्य आणि वीर्यानंतर लिंगाची अभिमानी जलदेवता उत्पन्न झाली .नंतर गुदद्वार प्रगट झाले .त्यापासून आपण वायू आणि अपानंतर त्याची अभिमानी ,लोकांना भयभीत करणारी ,मृत्यू देवता प्रगट झाली.

हस्तौ च निरभिद्येतां(म्), बलं(न्) ताभ्यां(न्) ततः(स्) स्वराट् ।

पादौ च निरभिद्येतां(ङ्), गतिस्ताभ्यां(न्) ततो हरिः ॥ 58॥

त्यानंतर हात प्रगट झाले , त्यापासून बल आणि बलानंतर हस्तेंद्रियाचा अभिमानी इंद्र प्रगट झाला . नंतर चरण प्रगट झाले .त्यापासून गती ( गमनाची क्रिया ) आणि मग चरणांची अभिमानी विष्णू देवता प्रगट झाली.

नाड्योऽस्य निरभिद्यन्त, ताभ्यो लोहितमाभृतम् ।

नद्यस्ततः(स्) समभवन्-नुदरं(न्) निरभिद्यत ॥ 59॥

नंतर त्या विराट पुरुषाला नाड्या उत्पन्न झाल्या .त्यापासून रक्त उत्पन्न झाले आणि नंतर त्यांच्या अभिमानी देवता नद्या प्रगट झाल्या .नंतर पोट प्रकट झाले.

क्षुत्पिपासे ततः(स्) स्यातां(म्), समुद्रस्त्वेतयोरभूत् ।

अथास्य हृदयं(म्) भिन्नं(म्), हृदयान्मन उत्थितम् ॥ 60॥

त्यापासून तहानभूक अभिव्यक्त झाली आणि मग उदयाची अभिमानी समुद्रदेवता उत्पन्न झाली. त्यानंतर हृदय प्रकट झाले ,हृदयापासून मन उत्पन्न झाले.

मनसश्चन्द्रमा जातो, बुद्धिर्बुद्धेर्गिरां(म्) पतिः ।

अहङ्कारस्ततो रुद्रश्-चित्तं(ञ्) चैत्यस्ततोऽभवत् ॥ 61॥

नंतर त्याचा अभिमानी चंद्र उत्पन्न झाला .नंतर हृदयापासूनच बुद्धी आणि त्याचा अभिमानी ब्रह्मदेव प्रकट झाला .नंतर अहंकार व त्या पाठोपाठ त्याची अभिमानी रुद्र देवता प्रगट झाली .यानंतर चित्त आणि त्याचा अभिमानी क्षेत्रज्ञ प्रकट झाला.

एते ह्यभ्युत्थिता देवा, नैवास्योत्थापनेऽशकन् ।

पुनराविविशुः(ख्) खानि, तमुत्थापयितुं(ङ्) क्रमात् ॥ 62॥

जेव्हा या क्षेत्रज्ञ व्यतिरिक्त सर्व देवता उत्पन्न होऊन सुद्धा विराट पुरुषाला उठविण्यास असमर्थ ठरल्या ,तेव्हा त्याला उठविण्यासाठी त्या देवता क्रमशः पुन्हा आपापल्या उत्पत्ती स्थानांमध्ये प्रविष्ट होऊ लागल्या.

वह्निर्वाचा मुखं(म्) भेजे, नोदति*ष्ठत्तदा विराट् ।

घ्राणेन नासिके वायुर्-नोदति*ष्ठत्तदा विराट् ॥ 63॥

अग्नीने वाणीसह मुखामध्ये प्रवेश केला ,परंतु त्यामुळे विराट पुरुष उठला नाही .वायु ने घ्राणेंद्रियासह नाकांच्या छिद्रात प्रवेश केला ,तरीसुद्धा  विराट पुरुष उठला नाही.

*अक्षिणी *चक्षुषाऽऽदि*त्यो, नोदति*ष्ठत्तदा विराट् ।

श्रोत्रेण कर्णौ च दिशो, नोदति*ष्ठत्तदा विराट् ॥ 64॥

सूर्य आणि चक्षुसह नेत्रात प्रवेश केला तरी पण विराट पुरुष उठला नाही .दिशांनी श्रवनेंद्रियासहित कानांमध्ये प्रवेश केला ,पण विराट पुरुष उठला नाही.

त्वचं(म्) रोमभिरो*षध्यो, नोदति*ष्ठत्तदा विराट् ।

रेतसा शि*श्नमाप*स्तु, नोदति*ष्ठत्तदा विराट् ॥ 65॥

औषधींनी रोमांसहित त्वचेमध्ये प्रवेश केला ,पण विराट पुरुष उठला नाही .पाण्याने वीर्यसह लिंगामध्ये प्रवेश केला ,तरीसुद्धा विराट पुरुष उठला नाही.

गुदं(म्) *मृत्युरपानेन, नोदति*ष्ठत्तदा विराट् ।

*हस्ताविन्द्रो बलेनैव, नोदति*ष्ठत्तदा विराट् ॥ 66॥

मृत्यूने अ पाना बरोबर गुदस्थानात प्रवेश करू नही विराट पुरुष उठला नाही. इंद्राने शक्तीसह हातांमध्ये प्रवेश केला, परंतु यानेही विराट पुरुष उठला नाही.

वि*ष्णुर्ग*त्यैव चरणौ, नोदति*ष्ठत्तदा विराट् ।

नाडीर्न*द्यो लोहितेन, नोदति*ष्ठत्तदा विराट् ॥ 67॥

विष्णू ने गतीसह चरणांमध्ये प्रवेश केला 'तरी विराट पुरुष उठला नाही .नद्यांनी रक्तासह नाड्यांमध्ये प्रवेश केला 'तरीही विराट पुरुष उठला नाही.

क्षुत्तृड्भ्यामुदरं(म्) सि*न्धुर्-नोदति*ष्ठत्तदा विराट् ।

हृदयं(म्) मनसा चन्द्रो, नोदति*ष्ठत्तदा विराट् ॥ 68॥

समुद्राने तहान भुकेसह उदरामध्ये प्रवेश केल्याने ही विराट पुरुष उठला नाही .चंद्राने मनासहित हृदया प्रवेश केला ,पण त्यानेही विराट पुरुष उठला नाही.

बुद्ध्या ब्रह्मापि हृदयं(न्), नोदति*ष्ठत्तदा विराट् ।

*रुद्रोभिम*त्या हृदयं(न्), नोदति*ष्ठत्तदा विराट् ॥ 69॥

ब्रह्मदेवाने बुद्धीसहित हृदयात प्रवेश केल्यानंतरही विराट पुरुष उठला नाही .रुद्राने अहंकारासहित त्यास हृदया प्रवेश केला ,पण विराट पुरुष उठला नाही.

**चित्तेन हृदयं(ञ्) चैत्यः(ह्), क्षेत्रज्ञः(फ्) प्राविशद्यदा ।**

**विराट् तदैव पुरुषः(स्), सलिलादुदतिष्ठत ॥ 70॥**

परंतु जेव्हा चित्ताचा अधिष्ठाताक्षेत्रज्ञ भगवान वासुदेव याने चित्ता सही तर हृदया प्रवेश केला ,त्याचवेळी विराट पुरुष पाण्यामधून उठून उभा राहिला.

**यथा प्रसुप्तं(म्) पुरुषं(म्), प्राणेन्द्रियमनोधियः ।**

**प्रभवन्ति विना येन, नोत्थापयितुमोजसा ॥ 71॥**

ज्याप्रमाणे लोकांमध्ये प्राण ,इंद्रिये ,मन आणि बुद्धी चित्ताचा अधिष्ठाता असणाऱ्या क्षेत्रज्ञाच्या सहाय्याशिवाय झोपलेल्या प्राण्याला आपल्या शक्तीने उठवू शकत नाहीत ,त्याप्रमाणे विराट पुरुषाला सुद्धा क्षेत्रज्ञ परमात्म्याशिवाय उठविता येत नाही.

**तमस्मिन् प्रत्यगात्मानं(न्), धिया योगप्रवृत्तया ।**

**भक्त्या विरक्त्या ज्ञानेन, विविच्यात्मनि चिन्तयेत् ॥ 72॥**

म्हणून भक्ती ,वैराग्य आणि चित्ताच्या एकाग्रतेतून प्रगट झालेल्या ज्ञानाने त्या अंतरात्म स्वरूप क्षेत्रज्ञाचे या शरीरात साक्षर रूपाने चिंतन केले पाहिजे.

**इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(न्)**

**तृतीयस्कन्धे कापिलेये तत्त्वसमाम्नाये षड्विं(म्)शोऽध्यायः ॥**

**ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते**

**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥**

**ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥**